

# मराठी - लेख - 2

**आसावरी सुर्वे, शाळा :** विद्या मंदिर, दहिसर

विद्यार्थी मित्रांनो,

मागील लेखामध्ये आपण नव्या पाठ्यपुस्तकाची ओळख करून घेतली होती. आज आपण पाठ्यपुस्तकामधील १ आणि २ पाठांचा अभ्यास करूया.

**पाठ क्रमांक १ : आधारीचेया परिसाचा दृष्टान्त - के सोबास**

(संग्रही असलेल्या परीसाचा दृष्टांत)

**प्रास्ताविक-** महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामी! महानुभाव पंथात श्रीचक्रधर स्वामी यांना परमेश्वरावतार मानतात. समाजाच्या सर्व स्तरांचे सूक्ष्मग्राही निरीक्षण करून सर्वसामान्यांना विशेष ज्ञान देण्यासाठी कथा सांगितल्या.

या कथाद्वारे आपल्याला यादवकालीन समाजाचे दर्शन घडते. दृष्टान्त पाठातील सर्व लघुतम कथा मनोरंजक, उद्‌बोधक आहेत. किंबहुना 'दृष्टान्त पाठा'तील ११४ दृष्टान्तांचे स्वरूप कथात्मक आहे. अनुभवाने संपन्न झालेल्या या कथा चिंतनशील आहेत.

**दृष्टान्ताचे स्वरूप-** दृष्टान्ताची व्याख्या करताना आने राजबास यांनी आपल्या 'लक्षणरत्नाकर' नामक ग्रंथात म्हटले आहे की, ज्याच्या योगाने तत्त्वाची सीमा स्पष्टपणे दिसते. त्यास दृष्टान्त असे म्हणतात.

श्रीचक्रधर स्वामींनी कथन केलेले आणि श्री केसोबास यांनी संकलित केलेल्या दृष्टान्त पाठात प्रथम सूत्र, त्यानंतर दृष्टान्त आणि शेवटी 'दार्ष्टान्तिक' असा क्रम आहे.

सूत्रे आणि दृष्टान्त यांची निवड 'लीळा' चरित्रातून केलेली आहे. तो भाग श्रीचक्रधर स्वामी यांचा आहे. मात्र दार्ष्टान्तिक मात्र केसोबास यांचे आहे.

**पाठाचा भावार्थ - सूत्र** (ऐहिक जीवनात जीवाला) जे जे योग्य ठरते ते ते (आध्यात्मिक जीवनात) अनिष्ट ठरते आणि (ऐहिक जीवनात) जे जे अयोग्य वाटते ते ते (आध्यात्मिक जीवनात) हिताचे ठरते.

**दृष्टान्त -** एका सत्पुरुषाजवळ परीस होता. तो सत्पुरुष एके दिवशी कोण्या ब्राह्मणाच्या घरी वस्तीस (मुक्कामास) गेला होता. त्या वेळी त्याच्या दारात थेंब थेंब पाणी ठिबकत होते. त्यामुळे त्याचे कपडे आंबट ओले झाले होते. ब्राह्मणाच्या पत्नीने ओसरीवर पाट मांडला व त्या सत्पुरुषाचे पाय धुतले. त्याला तांब्या भरून पाणी दिले. त्या सत्पुरुषाने संध्या केली. तेवढ्यात ब्राह्मण घरी आला. त्याच्या डोक्यावर रानपाल्याचा भारा होता. तो त्याने खाली टाकला.

असे ते ब्राह्मण कुटुंब गरीब होते. त्यांच्या घरी एक दुभती गाय होती. ब्राह्मणाने गायीची धार काढली. (ब्राह्मणाच्या पत्नीने) राळ्याची खिचडी केली. गोळाभर लोणी कढविले आणि मग त्यांची पाने मांडली. त्या दोघांच्यासह सत्पुरुषाचे जेवण झाले.

(ब्राह्मणीने) मोडक्या बाजेवर फाटकी अशी वाकळ अंथरली. त्या सत्पुरुषास झोपावयास दिली. त्याचे पाय धुतले. चेपले. एवढ्यामुळे तो संतुष्ट झाला (आणि म्हणाला) 'तुमची लोखंडाची जेवढी अवजारे आहेत, तेवढी माझ्या बाजेखाली आणून ठेवा.' मग त्या ब्राह्मणीने कुळव, नांगर, शिळा, कुऱ्हाड, ही दोराने बांधून त्याच्या बाजेखाली ठेविली. तो सत्पुरुष पहाटेच उठला आणि आपल्या जवळचा परीस अवजारांना लावून निघून गेला. (इकडे) तो ब्राह्मण उठला व डोक्यावर अवजारे ठेवून शेतावर गेला. कुळव जुंपला तर त्याचा फाळ वाकू लागला. त्याच्या वरची माती काढू लागला तर ती निघेना. बिळा घेऊन गवत कापू लागला तर गवत कापले जाईना. कुऱ्हाडीने झाड तोडू लागला तेव्हा कुऱ्हाडच वाकली. अशा रीतीने तो अगदी मेटाकुटीस आला. मग तो अवजारे डोक्यावर ठेवून ती घरी घेऊन आला. ती त्याने दारात ठेवली आणि तो (आपल्या पत्नीस) म्हणाला, 'हे पापिणी, तू कोणास आसरा दिलास?' त्या महात्म्याने काही जादूटोणा केलेला दिसतो. आज माझा सोन्यासारखा दिवस वाया गेला. त्या सत्पुरुषाने काय जादूटोणा केला. असे म्हणून ती बाहेर आली. तेव्हा उजाडले होते. अवजारांवरची माती काढली. तेव्हा आतील सोने चमकू लागले. ब्राह्मणी म्हणाली, 'महात्म्याने जादूटोणा केला की, आमच्या दारिद्र्यावरच हत्यार उपसले? असे म्हणून ती अवजारे घेऊन ती ब्राह्मण पत्नी घरात गेली.'

**दार्ष्टान्तिक** - तसेच हे महदा इसा, तुमच्यासाठी काय योग्य आहे ते श्रीचक्रधर स्वामी जाणतात.

या दृष्टान्तातून तत्कालीन जीवनाची माहिती मिळते. शेतकऱ्याची पत्नी सत्पुरुषाचे आतिथ्य करते. ती सत्पुरुषाच्या सेवेत आनंद मानते. शेती हा व्यवसाय, प्रधान व्यवसाय होता, शेत बेणणे, बिळा, कुऱ्हाड, फाळ इ. शेतकऱ्याच्या लोखंडी अवजारांची माहिती मिळते.

परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने करू पाहणारे आणि त्या विद्येच्या आश्रयाने लोकांना भुलविणारे धातुर्वादी व महात्मे होते याचा उल्लेख येथे आला आहे.

महात्म्याजवळ परीस होता परंतु परमार्थपर मार्गात एहिक वैभवाचे अप्रूप नसते. त्या महात्म्याने श्रमजीवी शेतकऱ्याचे दारिद्र्य नष्ट केले. श्रीचक्रधर स्वामी आपल्या अनुयायासाठी कोणती गोष्ट हितकारक आहे ते सांगतात.

**पाठ क्रमांक २ : छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे एक आज्ञापत्र**

**प्रास्ताविक** : मध्यमयुगीन मराठी वाङ्‌मयाने आज्ञापत्राच्या माध्यमाने इतिहासकालीन शासनकर्त्यांची खासीयत स्पष्ट केली आहे. शिवरायांचे हे आज्ञापत्र म्हणजे त्यांच्या राजनीतीचे दर्शनच होय. मराठी वाङ्‌मयाचा हा अमूल्य आणि अपूर्व अलंकारच समजला जातो.

शिवरायांची भाषा समर्थ आहे. येथे आशय आणि अभिव्यक्ती यांचा सुसंवाद प्रत्ययास येतो.

तसेच अत्यंत महत्त्वाचे सिद्धांत किंवा तत्त्वार्थ छोट्या वाक्यांमध्ये परिणामकारकरीतीने व्यक्त झाला आहे.

शिवकालीन भावविश्वाचे हे बोलके चित्र आहे. आज्ञापत्र म्हणजे श्री शिवरायांची आज्ञा सांगणारे राजपत्र होय. या अनुषंगाने फारशीच्या सान्निध्याने मराठी भाषेचे स्थित्यंतर झाले. याचा अनुभव घेता येतो.

त्याचप्रमाणे सतराव्या शतकातील मराठी भाषेचे स्वरूप जाणून घेता येते.

**आज्ञापत्राचा विषय** - छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी हे आज्ञापत्र आपले जुमलेदार, हवालदार व कारकून इत्यादींना लिहिले आहे. पत्राच्या सुरुवातीला 'श्री भवानी शंकर' असा उल्लेख आहे. परमेश्वराचे स्मरण करून पत्रास आरंभ केला आहे. चिपळूणमधील हलवर्ण येथे मुक्कामास असलेल्या आपल्या सैनिकांबरोबर कसा व्यवहार करावा, यासंबंधीच्या सर्व सूचनांचा सूक्ष्म तपशील या पत्रातून आलेला आहे.

**पत्राचा भावार्थ -** इतिहासकालीन मायना आरंभीच वाचायला मिळतो. सैन्याचा मुक्काम मौजे हलवर्ण, ता. चिपळूण व मामले दाभोळ येथे होता. चिपळूण येथे लष्कराची सर्व व्यवस्था केलेली होती. पावसाळ्यासाठी दाभोळच्या सुभ्यातील सैन्याच्या घोड्यांसाठी दाणागोटा व इतर वस्तू यांचा साठा केला होता. तो चिपळूणमध्ये मुक्कामास असलेल्या सैन्याच्या घोड्यांसाठी खर्च केला. आता पडत्या पावसाळ्यात घोडी मरण्याचा धोका निर्माण होऊ नये म्हणून प्राप्त असलेला दाणागोटा व गवत पुरवून न वापरल्यास उपासमार होऊन घोडी मरण्याची समस्या उभी राहील. सैनिक शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने अन्नधान्य, भाजीपाला, गवत, लाकूडफाटा लुटून घेऊन जाण्याचा धोका संभवेल. मोगल मुलकांत आले त्याहूनहि अधिक तुहमी! अशी लुटालूट केल्यास मोगलांपेक्षा मराठे वाईट असा तळतळाट देतील. म्हणून 'बहुत यादी धरून वर्तणूक करणे' 'खासेवाले असाल ते हमेषा फिरत जाऊन काळजी घ्यावी.' अशा शब्दांत आज्ञा केल्या आहेत.

'कोण्ही भलतेच जागा चुली, रंधनाळा करितील, कोण्ही तंबाकूला आगी घेतील, गवत पडिले आहे ऐसे अगर वारे लागले आहे ऐसे मनास ना आणिता ह्मणजे अविस्त्राच दगा होईल' या शब्दांत अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली आहे. त्यांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

**आज्ञापत्राची वैशिष्ट्ये** - राज्याच्या उभारणीत त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती व दूरदृष्टी दिसते. राज्याचा फौजफाटा उत्तम रीतीने सांभाळण्याची काळजी श्री शिवराय घेतात. रयतेस अपत्यवत् प्रेम देतात. येथे जीवनाच्या सारभूत तत्त्वाची प्रचीती येते. आज्ञापत्रकर्त्याची शब्दशक्ती अमोघ आहे. वाक्यांच्या सामर्थ्याने मन भारावून जाते. शब्दांच्या सुंदर मालिका पाहायला मिळतात. हे आज्ञापत्राच्या गद्याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. वाक्ये लांब असून ती संयुक्त स्वरूपाची आहेत.

पत्रात परिच्छेद पाडलेले दिसत नाहीत. अधिकारांच्या चुकांचे परिणाम नि:संदिग्ध शब्दांत वर्णन केलेले दिसतात. छत्रैती शिवाजी महाराजांचे कार्यकौशल्य, व्यवहारचातुर्य, प्रजेच्या संरक्षणव्यवस्थेचे भान राखणे हे आज्ञापत्राचे प्रधान अंग आहे. अश्वबल हे समर्थ राज्यांग आहे. त्यांचा सांभाळ करण्याचे आदेश देताना एका यशस्वी शासनकर्त्याची ओळख होते. दूरदृष्टीचा प्रवृत्तिधर्म उमगतो. म्हणूनच एका गोष्टीची महती कळते की, श्री शिवरायांचे हे आज्ञापत्र म्हणजे त्यांची राजनीती स्पष्ट करणारे राजपत्रच होय.

**उद्याचा विषय : मराठी**

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2008@gmail.com



यंदाच्या पावसाळ्यात तुमच्या मुलाला

**असुरक्षित** ठेवू नका.

पावसाळ्यामध्ये पाण्यावाटे फैलावणाऱ्या आजारांची जोखीम खूपच वाढते. ॲक्वागार्ड टोटल द्वारा तुमच्या कुटुंबीयांना जॉंडिस, टायफॉइड आणि डायरिया सारख्या आजारांपासून संपूर्ण सुरक्षा मिळत असल्याची खात्री करून घ्या. म्हणूनच 40 लाख माता केवळ ॲक्वागार्ड टोटल वॉटर प्युरीफीकेशन वर विश्वास ठेवतात.

फ्री होम डेमोसाठी 56006 ला "AG" SMS* करा किंवा फोन: 098210 48777, 3988 3333



Aquaguard Total

Total Health. Total Water Purification.

*स्पेशल SMS रेट्स लागू